मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 21 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान केंद्रांवर रांगा

**राजकीय सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी केले मतदान : सकाळी सात वाजल्या पासूनच मतदान केंद्रावर यायला सुरुवात**

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकशाहीचा सण साजरा करण्यासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी बुधवारी पुणे शहर, जिल्ह्यातील बहुसंख्य नागरिकांनी घराबाहेर पडून मतदानाचा हक्क बजावला. राजकीय, सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या घराजवळील मतदान केंद्रावर जात मतदान केले.

पुण्यातील आठ मतदार संघातील मतदान केंद्रावर सकाळी सात वाजल्या पासूनच नागरिकांची मतदान करण्यासाठी यायला सुरुवात झाली. प्रशासनाकडूनही मतदान केंद्रांवर मतदारांच्या सोयीसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या होत्या.



सकाळी मतदानाला सुरुवात झाल्यानंतर काही वेळाने नागरिकांची मतदान केंद्रांवरील गर्दी वाढली. मतदान केंद्रांवर रांगा लागल्याचे चित्र दिसले. ज्येष्ठ नागरिक, नव मतदार तरुण-तरुणी, अभिनेते, तृतीयपंथी यांनी आपल्या घराजवळील मतदारसंघावर मतदान करत मतदानाचा हक्क बजावला.

यंदा प्रशासनाकडून मतदारांच्या सोयीसाठी पाळणाघर हिरकणी कक्ष यांची व्यवस्था करण्यात आली होती तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअर आणि त्यांच्याच मदतीसाठी स्वयंसेवकांची देखील व्यवस्था करण्यात आली होती. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळाला.

दरम्यान पुणे व परिसरात राहणाऱ्या अभिनेत्यांनी देखील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करून आपले योगदान दिले. पर्वती मतदार संघातून प्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर हिने आपल्या कुटुंबीयांसह मतदान केले. तर कसबा पेठ मतदारसंघातून सुबोध भावे यांनी आपल्या कुटुंबीयांसह मतदान केले.

नटरंग चित्रपटातील अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी देखील पिंपरी चिंचवड भागातून मतदान केले. यासोबतच पुणे आणि परिसरातील माजी खासदार, माजी आमदार, माजी नगरसेवक, राजकीय नेते मंडळीं सह उमेदवारांनी देखील आपला मतदानाचा हक्क बजावला.

## आंदोलन केल्यानंतर बाबा कांबळे यांना मिळाला मतदानाचा अधिकार...

**मूळ आधार कार्डवर तुम्हाला मतदान करून द्यावे लागेल, अशी भूमिका घेतल्यामुळे मतदानाचा अधिकार बजावता**

**पिंपरी | प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मतदानाचा अधिकार नाकारला. त्यामुळे कामगार नेते बाबा कांबळे यांना आंदोलन करावे लागले. त्याची दखल घेतल्यानंतर त्यांना मताचा अधिकार मिळाला. त्यांनी मतदान केले.



निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव तसेच जनसंपर्क अधिकारी पुराणिक व स्थानिक पोलीस अधिकारी यांनी मध्यस्थी करून मूळ आधार कार्डवर तुम्हाला मतदान करून द्यावे लागेल, अशी भूमिका घेतल्यामुळे बाबा कांबळे यांना मतदानाचा अधिकार बजावता आलेला आहे.

याबाबत बाबा कांबळे म्हणाले, निवडणूक प्रक्रियेमध्ये कुशल अधिकाऱ्यांमुळे हे सगळा प्रकार घडला मी मूळ निवडणूक कार्ड घेऊन गेल्यानंतरही मला मतदानाचे ओळखपत्र मागवण्यात आले, हे चूक होते. मी आधार कार्डवरच मतदानाचा आग्रह धरला. यावेळी सबंधित अधिकाऱ्यांनी ते मान्य केले नाही. परंतु, याबाबत व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्यानंतर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव तसेच जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी हा व्हिडिओ पाहिला. त्यांनी स्वतः फोन करून याप्रकरणी तुम्ही आतमध्ये जा. तुम्हाला मतदान करून दिले जाईल, असे सांगितले. स्थानिक पोलीस घटनास्थळी आल्यानंतर संबंधित अधिकारी यांनी मतदान करून दिले आहे, अशा प्रकारची माहिती बाबा कांबळे दिली आहे.

## पीएमआरडीए तपासणार रस्त्यांच्या कामाची गुणवत्ता

**आयआयटी संस्थेमार्फत ही तपासणी करण्यात येणार आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील काही रस्त्यांच्या कामाबाबत तक्रारी आल्याने पीएमआरडीए प्रशासनाच्या वतीने संबंधित रस्त्यांच्या कामाची गुणवत्ता तपासली जाणार आहे. आयआयटी संस्थेमार्फत ही तपासणी करण्यात येणार आहे.



पीएमआरडीएकडून माण-हिंजवडी ते शिवाजीनगर, पाषाण, बाणेर आदी परिसरातील रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत पुणे आयटीसीटी मेट्रो रेलला नोटीस बजावली होती. या रस्त्यांची दुरवस्था झाल्याने वाहनधारकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पीएमआरडीएमार्फत होणार्या

विविध रस्त्यांच्या कामामध्ये पुरेशी दक्षता घेतली जात नसल्याचे आढळत आहे. या पार्श्वभूमीवर, अशा निकृष्ट कामे झालेल्या रस्त्यांच्या कामाची गुणवत्ता आयआयटीमार्फत तपासली जाणार आहे. तशा सूचना महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी दिल्या आहेत.

> **काही रस्त्यांच्या कामाची गुणवत्ता आयआयटीमार्फत तपासली जाणार आहे. त्याचप्रमाणे, सेक्टर 12 येथील पहिल्या टप्प्यात बांधलेल्या घरांचे बांधकाम निकृष्ट झाल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी आल्या आहेत. त्यांचीदेखील तपासणी केली जात आहे.**
>
> **- योगेश म्हसे, महानगर आयुक्त, पीएमआरडीए**

# अभ्यासिकांच्या फायर ऑडिटचे काम

## नवीपेठेतील अभ्यासिकेला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर महापालिका प्रशासनाकडून शहरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

नवीपेठेतील अभ्यासिकेला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर महापालिका प्रशासनाकडून शहरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्याबाबतचा अहवाल आता महापालिका आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे. अग्निशमन दलाकडूनही अभ्यासिकांच्या पाहणीचे (फायर ऑडिट) काम करण्यात येत आहे. अग्निशमन दलाकडूनही अभ्यासिकांची पाहणी सुरू करण्यात आली होती. मात्र, दिवाळीमुळे संबंधित काम थांबले होते, दिवाळीनंतर आता पुन्हा या कामाला सुरूवात झाली आहे.

नवी पेठेतील ध्रुवतारा अभ्यासिकेला ऑक्टोबर महिन्यात आग लागल्याची घटना घडली होती. आगीमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याचे नुकसान झाले होत. या घटनेमुळे अभ्यासिकांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुढे आला होता. याची गांभीर्याने दखल घेत, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी शहरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण करून, दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबतचा आदेश प्रशासनास दिला होता. त्यानुसार, महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून शहरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण करण्यात आले.

आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडून अहवालाची दखल घेऊन अभ्यासिकांना कोणकोणत्या उपाययोजना, सूचना लागू केल्या जाणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, बांधकाम विभागाकडून शहराच्या मध्यवर्ती भागात सदाशिव पेठ, नवी पेठ, नारायण पेठ, शनिवार पेठ, बुधवार पेठ या परिसरातील अभ्यासिकांचे सर्वेक्षण करण्यात आले.

त्यामध्ये संबंधित अभ्यासिकांकडून महापालिकेच्या नियमांचे पालन केले जात आहे का?, अभ्यासिकांची रचना, विद्यार्थ्यांची संख्या, आगविरोधक यंत्रणा या स्वरूपाची माहिती घेत सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये बहुतांश अभ्यासिकांमध्ये आगविरोधी यंत्रणांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले. सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल व अभ्यासिकांना बजावण्यात येणाऱ्या नोटीसचे स्वरूप महापालिका आयुक्तांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.



### अभ्यासिकांची सद्यःस्थिती

- अभ्यासिकांची संख्या – ७५० पेक्षा जास्त
- स्पर्धा परिक्षांची तयारी करणारे विद्यार्थी अंदाजे अडीच लाख
- मध्यवर्ती पेठांसह शिवाजीनगर, डेक्कनला सर्वाधिक अभ्यासिका
- बहुतांश अभ्यासिका जुने वाडे, जुन्या इमारतींमध्ये सुरू

> “आगीच्या घटनेनंतर अभ्यासिकांच्या पाहणीचे काम सुरू करण्यात आले. दिवाळीमध्ये हे काम थांबले होते, आता पुन्हा अभ्यासिकांची पाहणी सुरू करण्यात आली आहे. आठ दिवसांत हे काम पूर्ण करून, त्याबाबतचा अहवाल महापालिका आयुक्तांकडे सादर केला जाईल.”
>
> - देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी, महापालिका.

# मतदान होताच झळकले विजयाचे बॅनर

## 23 तारखेला मतमोजणी होणार आहे. तत्पुर्वी पुण्यातील विजयी उमेदवारांचे बॅनर झळकले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यातील शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सिद्धार्थ शिरोळे यांना शुभेच्छा देणारे बॅनर लागले आहेत. पुण्यातील शिवाजीनगर मतदारसंघ 2014 पासून भाजपचा किल्ला आहे. भाजपचे सिद्धार्थ शिरोळे हे विद्यमान आमदार असून ते पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यांनी 2019 साली काँग्रेसचे दत्ता बहिरट यांचा पराभव केला होता. त्यानंतर पुन्हा एकदा सिद्धार्थ शिरोळे आणि दत्ता बहिरट पुन्हा एकदा समोरासमोर उभे ठाकले आहेत. शिवाजीनगर मतदारसंघामध्ये 44.95 टक्के मतदान झाले आहे. मात्र, निकालाआधीच सिद्धार्थ शिरोळे यांच्या विजयाचे आणि शुभेच्छा देणारे बॅनर लागले आहेत.




तर दुसरीकडे मतदान संपताच खडकवासला मतदारसंघाचे मविआचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सचिन दोडके यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली आहे. त्याचबरोबर फटाके फोडत आणि सचिन दोडके यांना खांद्यावर घेत मोठी मिरवणूक काढली. दोडकेंची मिरवणूक सध्या मतदारसंघात चर्चेचा विषय ठरताना दिसत आहे. मतदान संपताच दोडके यांच्या विजयाचे फ्लेक्स लागले आहेत. कार्यकर्त्यांकडून कार्यालयाच्या बाहेर जोरदार जल्लोष करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी त्यांना शुभेच्छा देणारे बॅनर देखील लावण्यात आले आहेत.

खडकवासला मतदारसंघामध्ये भारतीय जनता पक्षाचे भीमराव तापकीर, मनसेचे उमेदवार मयुरेश रमेश वांजळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार दोडके सचिन यांच्यात तिरंगी लढत झाली आहे. मात्र, निकालाआधी कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार सचिन दोडके यांची विजयी मिरवणूक काढली आहे. मात्र, राज्यातील 288 मतदारसंघातील उमेदवारांसह नागरिकांचं लक्ष्य निकालाकडे लागलं आहे. मतदान प्रक्रिया पार पडते न पडते तोच पुण्यात लागलेले हे विजयाचे बॅनर चांगलेच चर्चेचा विषय ठरले आहेत.

# दिवाळीत पुण्यातील हवा विषारी!

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तपासणीत धक्कादायक निष्कर्ष

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा दिवाळीच्या काळात पुण्यातील हवा विषारी बनल्याचे समोर आले आहे. दिवाळीच्या कालावधीत हवेची प्रदूषण पातळी अनेक पटींनी वाढल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीतून निदर्शनास आले आहे. फटाक्यांमुळे हवेतील प्रदूषकांचे प्रमाण कमाल मर्यादा पातळीपेक्षा जास्त आढळून आले आहे.




महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने शहरात काही ठिकाणी दिवाळीच्या काळातील हवा प्रदूषणाची तपासणी केली. त्यात ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते १ नोव्हेंबर दुपारी १२ आणि १ नोव्हेंबर दुपारी १२ ते २ नोव्हेंबर दुपारी १२ अशा दोन दिवसांचा समावेश आहे. यातील पहिल्या दिवशी नरक चतुर्दशी होती, तर दुसऱ्या दिवशी लक्ष्मीपूजन होते. सर्वसाधारणपणे शहरात लक्ष्मीपूजनापासून फटाके मोठ्या प्रमाणात वाजविण्यास सुरुवात होते. त्यामुळे फटाके वाजविण्यास सुरू होण्याआधीचा कालावधी आणि सुरुवात झाल्यानंतरचा कालावधी अशी तुलनात्मक आकडेवारी मंडळाने दिली आहे.

शहरात शनिवारवाडा परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हवा प्रदूषणाची तपासणी केली. त्यात पहिल्या दिवशी पीएम १० या सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण सरासरी १३५.१९ होते. हेच प्रमाण दुसऱ्या दिवशी वाढून तब्बल ३९५.९६ वर पोहोचले. दुसऱ्या दिवशी रात्री १२ वाजता हे प्रमाण १ हजार ५९९ या उच्चांकी पातळीवर पोहोचले होते. तसेच, पीएम २.५ या सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण पहिल्या दिवशी ५१.३२ होते; ते दुसऱ्या दिवशी १४० वर गेले. हे प्रमाण दुसऱ्या दिवशी रात्री १२ वाजता ५४९ वर गेले होते. सल्फर डाय ऑक्साईडचे प्रमाण पहिल्या दिवशी १३.७६ होते आणि दुसऱ्या दिवशी १७.२० नोंदविण्यात आले. हे प्रमाण दुसऱ्या दिवशी रात्री ११ वाजता २८.०५ वर पोहोचले होते.

# विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांचे भवितव्य मतपेट्यांमध्ये बंद

## शहरातील तीन विधानसभा मतदारसंघातील एकूण 53 उमेदवारांचे भवितव्य जनतेने मतपेट्यांमध्ये बंद केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याच्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. शहरातील तीन विधानसभा मतदारसंघातील एकूण 53 उमेदवारांचे भवितव्य जनता जनार्दन मतपेट्यांमध्ये बंद केले तर पिंपरी विधानसभा मतदार संघात एकून 15 उमेदवार आपले नशिब आजमवित आहेत.

गेल्या एक महिन्यापासून उडत असलेला प्रचाराचा धडाका सोमवारी सायंकाळी थांबला. त्यानंतर वैयक्तिक भेटी-गाठींवर उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी भर दिला आहे. आपल्या मतदारांनी मतदान करावे, यासाठी सर्वच उमेदवार जोरदार प्रयत्न करत आहेत. यासाठी बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांची फौज कामाला लागली आहे.

शहरातील तीनही मतदारसंघांमध्ये महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत दिसत असली तरी लहान पक्ष आणि अपक्षांनी प्रचारात कडवे आव्हान उभे केलेले दिसून आले आहे. याचा मतदानावर किती परिणाम होईल हे 23 नोव्हेंबर रोजीच कळणार आहे. परंतु अपक्ष आणि लहान पक्षांना पडणारी मते मुख्य उमेदवारांचे समीकरण बदलू शकतात, हे मात्र निश्चित आहे.

विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मतमोजणी केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.



### भोसरी विधानसभा मतदारसंघ

» या मतदारसंघात सर्वाधिक चुरशीची लढत दिसूनं येत आहे. इतर दोन मतदारसंघाच्या तुलनेत हा मतदारसंघ प्रचारा दरम्यान मोठ्या प्रमाणात चर्चेत होता. येथे सलग दोनदा विजयी ठरलेले आमदार महेश लांडगे महायुतीचे उमेदवार आहेत तर महाविकास आघाडीने नव्या चेहर्याच्या रुपात अजित गव्हाणे यांना रिंगणात उतरविले आहे. या मतदारसंघात एकूण 11 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. बहुजन समाजवादीचे बलराज कटके, एमआयएमचे अमजद खान, स्वराज्य शक्ती सेनेचे जावेद शहा, तर अरुण पवार, खुदबुद्दीन होबळे, गोविंद चुनचुने, हरिश डोळस, रफिक कुरेशी, शलाका कोंडावार आदी अपक्ष म्हणून नशीब आजमावत आहेत

### पिंपरी विधानसभा मतदारसंघ

» पिंपरी विधानसभा मतदार संघात महायुतीचे अधिकृत उमेदवार अण्णा बनसोडे व महाविकास आघाडीच्या सुलक्षणा धर यांच्या प्रमुख लढत होते आहे. मात्र, तरीदेखील महाराष्ट्र स्वराज्य पार्टीचे बाळासाहेब ओव्हाळ, वंचित बहुजन आघाडीचे मनोज गरबडे तर मिनाताई खिल्लारे व बी. के. कांबळे हे अपक्ष हे उमेदवारदेखील निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### चिंचवड विधानसभा मतदारसंघ

» चिंचवड विधसनसभा मतदार संघात महायुतीचे शंकर जगताप विरूद्ध महाविकास आघाडीचे राहुल कलाटे यांच्यात प्रमुख लढत असली, तरीदेखील राष्ट्रवादीचे बंडखोर भाऊसाहेब भोईर यांनीदेखील या लढतीत रंगत आणली आहे.याशिवाय संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतिश काळे हे स्वराज्य राष्ट्रनिर्माण सेनेच्या तिकीटावर मैदानात उतरले आहेत. त्याचबरोबर उमेदवार मारुती भापकर हे देखील सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते आहेत. त्यांनाही माणनारा वर्ग आहे. या दोन्ही उमेदवारंच्या मतांचा फरक प्रस्थापितांच्या मतांवर नक्कीच पडणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

# मतदान केंद्रांवर ज्येष्ठ दिव्यांग मतदारांसाठी विशेष व्यवस्था

## प्रत्येक मतदान केंद्रावर व्हीलचेअर्स व ने-आण करणेकामी स्वयंसेवक, प्रत्येक मतदान केंद्रावर रॅम्प व्यवस्था

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदार संघातील ज्येष्ठ दिव्यांग व्यक्तींना मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर आणून मतदान केल्यानंतर पुन्हा घरी सोडण्यासाठी ३० ऑटो रिक्षांची व्यवस्था, १०२ मतदान केंद्रांवर प्रत्येकी दोन प्रमाणे २०४ व्हिलचेअरची व्यवस्था केली आहे. माहिती घेण्यासाठी प्रत्येक केंद्रांवर ब्रेल लिपितील मतपत्रिका ठेवली आहे. आशा सेविकांमार्फत प्रथोमोपचार पेटी देऊन प्राथमिक उपचाराची सुविधा दिली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार दिली.

लोकशाही बळकट करण्यासाठी दिव्यांगांचे मतदान सुध्दा बहुमूल्य ठरत असते. त्यासाठी चिंचवड विधानसभा मतदार संघातील दिव्यांग व्यक्तींना तसेच दिव्यांग ज्येष्ठ मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर व्हीलचेअर्स व ने-आण करणेकामी स्वयंसेवक नेमले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर रॅम्प व्यवस्था केली आहे.

जनसंपर्क अधिकारी ज्या दिव्यांग व ज्येष्ठ नागरीकांना मतदानाच्या दिवशी वाहन व्यवस्थेची आवश्यकता भासेल, अशा नागरिकांनी सहायक आयुक्त श्रीनिवास दांगट (९८२२०१२६८७), सहायक नोडल अधिकारी गणेश टिळेकर (९५१९७६७०८०), इंटरप्रिटर स्मिता घबाडे (९६५७८४११७२) यांच्याशी संपर्क साधून सुविधा उपलब्ध करून घ्यावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी केले.



### अंध व्यक्तीनसाठी ब्रेल लिपीत माहिती

» ४४४ अंध दिव्यांग नागरिकांना ब्रेल लिपीतील मतदार माहिती पत्रिका वाटप करण्यात आल्या आहेत. अंध मतदारांकरीता प्रत्येक केंद्रावर ब्रेल लिपीतील डमी मतपत्रिका माहितीसाठी ठेवली जाणार आहे. अंध व्यक्तींसाठी मतदान केंद्रावर भिंग (मॅग्नीफाइंग ग्लास) पुरविले जातील. ईव्हीएम मशीनवर ब्रेलमध्ये क्रमांक छापलेले असतील. ब्रेल लिपीतील मतपत्रिका वाचून त्यावरील क्रमांक लक्षात ठेवून अंध व्यक्ती स्वतःचे मत देऊ शकतील. अंध दिव्यांगांना मतदान करतेवेळी मतदान केंद्रावर बरोबर एका अठरा वर्षावरील व्यक्तीस सोबत घेऊन जाता येईल, ब्रेल लिपीमध्ये मतपत्रिका मतदान केंद्रावर वाचण्यासाठी उपलब्ध आहे.

### कर्णबधिर मतदारांसाठी इंटरप्रिटरची व्यवस्था

» सक्षम ॲपवर नोंदणी केलेल्या दिव्यांग नागरीकांना त्यांच्या मागणी नुसार मतदानाचे दिवशी आवश्यक सुविधा दिल्या जाणार आहेत. कर्णबधिर दिव्यांग मतदारांकरीता साइन लॅंग्वेजमध्ये मतपत्रिका समजून घेण्यासाठी इंटरप्रिटर असणार आहेत. ज्या ठिकाणी कर्णबधिर मतदाराला मतदान करताना अडचण येईल, अशा ठिकाणी तात्काळ इंटरप्रिटरची व्यवस्था केली जाईल. कर्णबधिर दिव्यांगाकरीता मतदान सुविधेबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, पुणे येथे हेल्पलाईन क्रमांक ९२२६३६३००२ जाहीर केला आहे. कर्णबधिर नागरिकांच्या बैठका घेवून त्यांना मतदान प्रक्रिया व हेल्पलाइनची माहिती देणेत आली .

# एसटीचे वायफाय आउट ऑफ रेंज

## राज्य परिवहन महामंडळाचे अपयश, तिकीट काढताना प्रवाशांना अजूनही कॅशलेस धक्के

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना यूपीआयद्वारे तिकीट काढण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. मात्र त्याच्या वापरात सध्या अडचणी येत आहेत. तिकिटासाठी यूपीआय अ‍ॅपचा वापर करण्याबाबत प्रवाशांची आग्रही भूमिका असते, मात्र वाहकांकडून विविध सबबी सांगून रोकड विरहित (कॅशलेस) व्यवहार करण्याचा आग्रह प्रवाशांना करण्यात येत आहे.

परंतु कधी क्यूआर कोड स्कॅन होत नाही, तर कधी वायफायला रेंज नाही, अशी विविध कारणे प्रवाशांना दिली जात आहेत. परिणामी, एसटीत रोकड विरहित व्यवहाराचे प्रमाण अजूनही ४ ते ५ टक्केच आहे. त्यामुळे एसटी महामंडळाने मोठा गाजावाजा करून सुरू केलेल्या रोकड विरहित प्रवासात प्रवाशांना अजूनही धक्के खावे लागत आहेत.

देशात सर्वत्र रोकड विरहित व्यवहार मोठ्या प्रमाणात होत असताना एसटीमध्ये मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची स्थिती आहे. एसटीचा सर्वाधिक प्रवासी हा ग्रामीण भागातील असून, तो आजही तंत्रज्ञानापासून दूर असल्याचा समज एसटी प्रशासनाचा आहे. प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागातील प्रवासीदेखील मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानस्नेही आहेत.

दिवाळीच्या काळात एसटीने मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक केली. यात तरुण प्रवाशांची संख्यादेखील जास्त होती. त्यांनी वाहकाकडे क्यूआर कोड स्कॅन करून तिकिटाची रक्कम अदा करण्याची विनंती केली, मात्र वाहकांनी आपल्या जवळचे मशिन नादुरुस्त आहे. त्यावरील क्यूआर स्कॅन होत नसल्याचे अनेक गाड्यांमधील वाहकांनी सांगितले. त्यामुळे रोख रक्कम जवळ न बाळगणाऱ्या अथवा सुट्ट्या पैशांची कमतरता असणाऱ्या प्रवाशांची गैरसोय झाली. पहिल्या टप्प्यात यूपीआय अ‍ॅपद्वारे, तर दुसऱ्या टप्प्यात डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे तिकिटाची रक्कम अदा करण्याचे नियोजन होते. मात्र यूपीआय अ‍ॅपच्या पहिल्याच टप्पावरचा प्रवासच अडखळला आहे. दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वीच या अडचणी सोडविणे आवश्यक आहे.



### वर्षात केवळ 4 टक्के वापर...

**» राज्य परिवहन महामंडळाने ७ डिसेंबर २०२३ला यूपीआय अ‍ॅपद्वारे तिकीट काढण्याची सुविधा राज्यातील सर्व आगारांत सुरू केली. वाहकांच्या जवळ असलेल्या इटीआय मशिनमध्ये आवश्यक ते तांत्रिक बदल करण्यात आले. यातच क्यूआर कोडची सुविधा देण्यात आली. गेल्या वर्षभरात याचा वापर केवळ ३ ते ४ टक्केच झाल्याचे एसटी प्रशासनाचे म्हणणे आहे, तर मोबाइल अ‍ॅप व संकेतस्थळाचा वापर करून ऑनलाइन तिकीट काढणाऱ्यांचे प्रमाण १५ ते १८ टक्के झाले आहे.**

### टप्प्यावरचा प्रवास अडखळला...

**» एसटी महामंडळाने रोकड विरहित व्यवहारांसाठी दोन टप्प्यांमध्ये नियोजन केले. पहिल्या टप्प्यात यूपीआय अ‍ॅपद्वारे, तर दुसऱ्या टप्प्यात डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे तिकिटाची रक्कम अदा करण्याचे नियोजन होते. मात्र यूपीआय अ‍ॅपच्या पहिल्याच टप्पावरचा प्रवासच अडखळला आहे. दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वीच या अडचणी सोडविणे आवश्यक आहे.**

"वायफायच्या रेंजबाबत कधीतरी अडचण येऊ शकते. मात्र सर्वच मशिनमध्ये क्यूआर कोडसंदर्भात अडचण नाही. वाहकांना या संदर्भात आवश्यक त्या सूचना देण्यात येईल. प्रवाशांनी अधिकाधिक प्रमाणात यूपीआयचा वापर करावा.".

**- प्रमोद नेहूल, विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ, पुणे**

# कोरेगाव पार्कमधील मतमोजणी केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

## वडगाव शेरी, हडपसर, कोथरुड, पर्वती, खडकवासला, कसबा, शिवाजीनगर, कॅन्टोन्मेंट येथील मतमोजणी कोरेगाव पार्क येथील धान्य गोदामात

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया बुधवारी (दि. २०) पार पडल्यानंतर शनिवारी (दि. २३) मतमोजणी होणार आहे. त्यामुळे कोरेगाव पार्क भागातील मतमोजणी केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. हा आदेश सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिला आहे. त्यानुसार मतमोजणीची प्रक्रिया पार पडेपर्यंत या भागात प्रतिबंधात्मक आदेश लागू राहणार आहेत.

शहरातील वडगाव शेरी, हडपसर, कोथरूड, पर्वती, खडकवासला, कसबा, शिवाजीनगर, कॅन्टोन्मेंट या आठ मतदारसंघांची मतमोजणी कोरेगाव पार्क येथील धान्य गोदामात शनिवारी (दि. २३) पार पडणार आहे. मतदान संपल्यानंतर मतपेट्या बंदोबस्तात ठेवण्यात येणार आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव कोरेगाव पार्क येथील धान्य गोदामाच्या परिसरात बुधवारी मध्यरात्रीपासून प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

मतमोजणी केंद्राच्या परिसरात खासगी संस्था, संघटनेकडून ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास मनाई घालण्यात आली आहे. छापील मजकूर चिकटवणे, तसेच प्रसारित करण्यास मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्र परिसरात शासकीय वाहने वगळता अन्य वाहनांना प्रवेश देण्यात येणार नाही. अधिकृत ओळखपत्राशिवाय (पास) मतमोजणी केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही, असे त्यांनी आदेशात नमूद करण्यात आले आहे.




### मतदान केंद्राच्या परिसरात वाहने लावण्यास मनाई

**» शहरातील विविध मतदान केंद्राच्या परिसरात सकाळी सहा ते सायंकाळी सात या वेळेत वाहने लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिले आहेत. अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे. शहरातील अनेक मतदान केंद्रे रहिवासी भागात आहेत. या भागात वाहने लावल्यास मतदारांना मतदान केंद्रात पोहोचण्यास अडथळे येतील. मतदान केंद्राच्या परिसरात २०० मीटर अंतरापर्यंत सर्व प्रकारची वाहने लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. २०० मीटर अंतराबाहेर उपलब्ध असलेल्या जागेत वाहने लावण्यात यावीत. ज्या ठिकाणी वाहने लावण्याची सुविधा नाही. अशा रस्त्यांवर कडेला वाहने लावावी. मतदारांना अडथळा होईल, अशा पद्धतीने वाहने लावू नये, असे आवाहन पोलीस उपायुक्त झेंडे यांनी केले आहे.**

### हे आहेत प्रतिबंधात्मक आदेश

**» मतमोजणी केंद्र, तसेच परिसरात शस्त्र बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशातून पोलीस, केंद्रीय सुरक्षा दल, तसेच राज्य राखीव पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना वगळण्यात आले आहे. मतमोजणी केंद्राच्या परिसरात मोबाइल, लॅपटॉप, कॉर्डलेस दूरध्वनी, तसेच बिनतारी संदेश यंत्रणेचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्रात काडीपेटी नेण्यास मनाई करण्यात आली आहे, असे आदेश सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिले आहेत. मतमोजणी केंद्राच्या परिसरात खासगी संस्था, संघटनेकडून ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास मनाई घालण्यात आली आहे. छापील मजकूर चिकटवणे, तसेच प्रसारित करण्यास मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्र परिसरात शासकीय वाहने वगळता अन्य वाहनांना प्रवेश देण्यात येणार नाही. अधिकृत ओळखपत्राशिवाय (पास) मतमोजणी केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही, असे त्यांनी आदेशात नमूद करण्यात आले आहे.**